# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.२९/०७/२०२२

**प्रेसनोट**

वसई विरार शहर महानगरपालिका व 'नॅशनल सफाई कर्मचारी फाईनॅन्स एंड डेव्हलेपमेंट कॉर्पोरेशन पुरस्कृत कॅम फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी मैला हाताळणी प्रतिबंध अधिनियम २०१३ च्या अनुषंगाने "व्यावसायिक धोकादायक आरोग्य आणि त्यावर उपाययोजना, मानवी मैला हाताळणी प्रतिबंध कायदा २०१३ आणि याची अंमलबजावणी तसेच वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणांचे प्रात्यक्षिक" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन दि.२८ जुलै, २०२२ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील मा.महासभा सभागृहात करणेत आले होते. सदर प्रशिक्षणात कॅम फाउंडेशन यांच्या तर्फे श्री.प्रणव टोम्पे व श्री.संतोष पाखरे यांनी कर्मचाऱ्यांना मानवी मैला हाताळणी प्रतिबंध अधिनियम २०१३ अधिनियमांची अंमलबजावणी व सुरक्षित उपकरणे यांचे प्रात्यक्षिक दिले. सफाई करताना घ्यावयाची खबरदारी व उपाययोजना यासंबंधीची माहितीही देण्यात आली. तसेच यावेळी सफाई कामगारांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणांचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमात मा.अति.आयुक्त श्री.अजिंक्य बगाडे, मा.उप-आयुक्त डॉ.चारुशीला पंडित, प्र.सहा.आयुक्त मनाली शिंदे, सर्व वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, सर्व कनिष्ठ आरोग्य निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**